**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १४/२०१२ मधील नि. ८८ वरील आदेश**

प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. ४ ते ८ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना दि. १३/०६/२००७ रोजी करुन दिलेले खरेदीपत्र तसेच प्रतिवादी क्र. ३ हिने प्रतिवादी क्र. १ व २ यांना लिहून दिलेले दि. १८/०६/२००९ रोजीचे खरेदीपत्र बेकायदेशीर व शून्यमत आहे या ठरावासाठी दाखल केला आहे. सदरची मुळ खरेदीपत्रे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याकडे आहेत. ती खरेदीपत्रे या दाव्याकामी हजर करावीत असा त्यांना आदेश व्हावा अशी विनंती अर्जात करण्यात आली आहे.

०२. प्रतिवादींतर्फे सदरच्या अर्जास आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे असे कथन आहे की अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. केवळ वेळकाढूपणा करण्यासाठी अर्ज दिलेला आहे. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. वादीतर्फे सन्माननीय वकील श्री. धामापूरकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे वकील गैरहजर आहेत. मुळ खरेदीपत्रे आपल्या कब्जात नाहीत असे प्रतिवादींचे म्हणणे नाही. तसेच खरेदीपत्रे झालेली आहेत ही बाब स्पष्ट झालेली आहे. त्यामुळे दाव्याच्याकामी सदर मूळ खरेदीपत्रे न्यायालयात असणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात येतो. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी पुढील तारखेपर्यंत सदर खरेदीपत्रे न्यायालयात हजर करावीत.

सही/—

मालवण, ( संतोष द. चव्हाण)
दिनांक : १८/१२/२०१५ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.